# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/१२/२०१८

## ग्रामीण पोलीस दलाचे - जागर स्त्री आरोग्याचा उपक्रमाअंतर्गत महिलांसाठी मेमोग्राफी व पॅप स्मिअर तपासणी शिबीराचे आयोजन

---

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात महिलांना घरगुती कामासह कुटूंबाची सर्वस्वी जबाबदारी पार पाडावी लागते, नोकरदार महिलांना तर नोकरी आणि कुटूंब अशी दुहेरी जबाबदारी पार पाडतांना स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. महिलांचे आरोग्य बिघडले, तर कुटूंबाचे स्वास्थ्य बिघडते. त्यामुळे महिलांनी स्वत:चे आरोग्य निरोगी राखणे अत्यंत महत्वाचे आहे, यासाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन **ग्रामीण पोलीस दलातर्फे - जागर स्त्री आरोग्याचा** उपक्रमाअंतर्गत आज रोजी आडगाव पोलीस मुख्यालयातील बहुउद्देशीय हॉल येथे ग्रामीण पोलीस दल व रोटरी क्लब ऑफ नाशिक(नॉर्थ) यांचे संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत मेमोग्राफी टेस्ट (स्तन कर्करोग तपासणी) व पॅप स्मिअर टेस्ट (गर्भाशय कर्करोग तपासणी) तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरास प्रमुख अतिथी म्हणुन **सौ.रोहिणी संजय दराडे,** यांचेसह महिला सपोनि **तृष्णा गोपनारायण**, महिला पोलीस उपनिरीक्षक **श्रीमती सुवर्णा महाजन, श्रीमती पुनम राउत, श्रीमती गिरी** तसेच जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय महिला पोलीस अधिकारी व महिला कर्मचारी, पोलीस कुटूंबातील महिला तसेच पोलीस सखी मंचाच्या सदस्या मोठया संख्येने उपस्थित होत्या.

सदर शिबीरात उपस्थित असलेल्या महिलांची प्राथमिक तपासणी करून आवश्यक त्या महिलांची मेमोग्राफी व पॅप स्मिअर (स्तन व गर्भाशय कॅन्सर टेस्ट) तपासणी करण्यात आली. दिवसभरात सुमारे २०० हुन अधिक महिलांनी सदर शिबीराचा लाभ घेतला. रोटरी क्लब ऑफ नाशिक (नॉर्थ) व अमरावती मिडटाउन मेमोग्राफी पथकातील **डॉ. नितीन लाड (स्त्रीरोग तज्ञ नवजीवन हॉस्पिटल)** व संस्थेचे सदस्य यांचे मार्फतीने उपस्थित महिलांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित महिलांना स्तन कर्करोग व गर्भाशयाचे कर्करोगाबाबतची लक्षणे कोणती, प्राथमिकदृष्टया कोणती काळजी घेणे गरजेचे आहे याबाबत उपस्थित डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. तसेच महिलांवरील कामाच्या तणावामुळे निर्माण होणा-या समस्या, रोग-व्याधी, अशक्तपणा, वंध्यत्व उपचार, गर्भसंस्कार, तसेच महिलांच्या इतर आजारांवर मार्गदर्शन व औषोधोपचारा बाबत माहितीही देण्यात आली. महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत महिलांना जागरूक करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी प्रतिपादन केले.

शिबीराचे उद्घाटन मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो., तसेच रोटरी क्लब ऑफ नाशिक (नॉर्थ) चे प्रेसिडंट श्री. मनिष ओबेरॉय, सेक्रटरी श्री. निखील खोत, डॉ.नितीन लाड यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री. सुरेश जाधव, मानव संसाधन विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक रत्नपारखी यांचेसह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच जिल्हयातील पोलीस सखीमंच प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक कार्यालयातील महिला लिपीक व महिला पोलीस कर्मचारी, तसेच पोलीस कुटूंबातील महिलांनी या शिबीरास मोठया प्रमाणात उपस्थिती नोंदविली.